# Department of History

## इतिहास विभाग

## वार्षिक अहवाल शैक्षणिक वर्ष 2024-25

### शैक्षणिक मूल्यमापन

शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये इतिहास विभागात एकूण एकूण ३६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. त्यापैकी प्रथम वर्ष कला शाखेत 19,द्वितीय वर्ष कला शाखेत १३व तृतीय वर्ष कला शाखेत ०४ विद्यार्थ्यांनी इतिहास हा विषय स्पेशल विषय म्हणून निवडलेला आहे. इतिहास विभागाद्वारे नियमितपणे मिटिंग्सचे आयोजन करून कामाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली. नियमितपणे तासिका घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार अंतर्गत मूल्यमापन पार पाडण्यात आले.

अंतर्गत मूल्यमापन, प्रॅक्टिकल, असाइनमेंट, प्रोजेक्ट, प्रक्टीकॅल, इत्यादी संदर्भात वेळोवेळी सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आल्या तसेच त्यांच्या अडचणींचे निवारण करण्यात आले. प्रत्येक वर्गासाठी विषयनिहाय गुगल क्लासरूम व whats up ग्रूप तयार करून त्यावर विषयासंदर्भातल्या नोटिस, अभ्यासक्रमाचे साहित्य, असाइनमेंट, महत्वाचे प्रश्न इत्यादी उपलब्ध करून देण्यात आले.

### अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रम

इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी एनएसएस, विद्यार्थी विकास मंडळ, सांस्कृतिक विभाग तसेच इतर विविध विभागांनी वर्षभरात आयोजित केलेल्या विविध उपक्रम व कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेऊन आपली उपस्थिती नोंदवली.

तसेच इतिहास विभागाद्वारे विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले ,महात्मा फुले ,छत्रपती शिवाजी महाराज ,तानाजी मालुसरे व हिरकणी यांच्या जीवन चरित्रावर आधारित ऐतिहासिक लघुपट ,चित्रपट आयोजित केले जातात.ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती,राष्ट्रप्रेम व इतिहासाची जाणीव निर्माण होऊ शकेल. इतिहास विभागाची अभ्यास सहल फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पांडव लेणी, नाशिकमधील कॉईन म्युझियम व अंजनेरी येथे जाणार आहे.

### विद्यापीठ परीक्षा व कार्यशाळांमधील सहभाग

प्रा.केदार आर.ए यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ परीक्षेमध्ये शारदा महाविद्यालय, सिन्नर येथे बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून 25/11/2024 ते 11/12/2024 या कालावधीत कामकाज पाहिले.तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ परीक्षेच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनात (CAP) दि.२५ डिसेंबर २०२४ ते ७ जाने. २०२५ बिटको कॉलेज येथे सहभाग नोंदविला,तर दि.२५जाने.२०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत मनमाड कॉलेज मध्ये सहभाग नोंदविला.दि.६ ऑगस्त २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या प्रथम वर्ष कला इतिहासविषयाच्या कार्यशाळेत(syllabus Workshop) सक्रीय सहभाग घेतला. तसेच दि.२७ व २८ सप्टेंबर २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने "भारतीय ज्ञान व्यवस्था" या विषयावर आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सक्रीय सहभाग घेतला.दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी के.के.वाघ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने आयोजित केलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभाग घेतला.

## संशोधन  संदर्भातील योगदान

प्रा. आर.ए.केदार  यांनी या कर्मवीर काकासाहेब वाघ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पिंपळगाव बसवंत आयोजित केलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत “छत्रपती शिवाजी महाराजांची महसूल व्यवस्था” विषयावर शोध निबंध प्रसिद्ध केला.

## NAAC संदर्भातील कामकाज

प्रा. आर.ए.केदार  यांनी Criterion 1 – Curricular Aspectsयाचे प्रमुख म्हणून काम करून सन २०२४-२५ मधील AQAR पूर्णपणे भरून NAAC website upload केला. व त्या संदर्भातील सर्व पुरावे महाविद्यालय website देखील upload करण्यात आले. प्रा.आर.ए.केदार यांनी CRITERION VI, CRITERION IV,  ऑनलाईन अपलोड करण्यात मोलाचे सहकार्य केले.

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षा निकाल

परीक्षेत बसलेले एकूण विद्यार्थी - ०७      उत्तीर्ण झाले विद्यार्थी - ०५   एकूण निकाल – ७१.४२%